# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३४८१**

**अपिलार्थी श्री. ॲड. प्रशांत दिवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०८.२०२४ | ०२.०९.२०२४ | १०.०९.२०२४ | २२.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.१०.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "H.R. महाविद्यालयाने AICT अंतर्गत नोंदणी केलेली आहे का व असेल तर त्यासंबंधी महाविद्यालयाकडे असलेल्या सर्व कागदपत्रांची छायांकित व साक्षांकित प्रत.*
*(२) H.R. महाविद्यालयामधील किती कोर्स AICT अंतर्गत येतात याची माहिती.*
*(३) H.R. महाविद्यालयामधील B.M.S. (बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज) या कोर्ससाठी आपण उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा CET सेलकडे रजिस्ट्रेशन केले आहे का याची माहिती."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, Regarding your RTI application under reference, I would like to clarify that the application appears to be filed not for a public purpose but rather to exert pressure on the College to admit ineligible students recommended by you in your capacity as President of Rashtrawadi Vidyarthi Congress. The College offers a Bachelor of Management Studies (BMS) program, which has been approved by the All India Council for Technical Education (AICTE). The Government of Maharashtra has established the State Common Entrance Test Cell, as per Section 10 of

the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015. This CET Cell conducts entrance exams for admission to various professional courses in the state, including Management programs. The H-CET (HSNCU Common Entrance Test) and MH-CET (Maharashtra Common Entrance Test) are the qualifying examinations for admission to BMS programs offered under HSNC University Mumbai. As the BMS program is an unaided self-finance course, it falls outside the purview of the Right to Information (RTI) Act, and thus, no information can be provided under the Right To Information Act.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेले उत्तर योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे अधिवक्ता उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, BMS कोर्ससाठी महाविद्यालयाकडे परवानगी नसताना प्रवेश दिले गेले. म्हणून माहितीची मागणी केली होती. सदर अभ्यासक्रम AICT अंतर्गत येतात का, त्या अभ्यासक्रमास मान्यता आहे का त्यासंबंधीत कागदपत्रांची प्रत आवश्यक आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना स्पष्ट उत्तर दिले की, BMS अभ्यासक्रम All India Council for Technical Education कडून मान्यता प्राप्त आहे व त्यांनी अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. सदर अभ्यासक्रम Un- Aided तत्वावर चालविला जातो.

७. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमासाठी जुन- जुलै मध्ये प्रवेश दिले. जेव्हा की, सदर अभ्यासक्रमासाठी ऑक्टोबरमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे. म्हणून त्यांनी कागदपत्रांची मागणी केली होती.

८. अपिलार्थींना सदर विषयी तक्रार असेल तर त्यांनी संबंधीत प्रशासकीय विभागाकडे तक्रार करणे आवश्यक आहे.

९. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेले उत्तर योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

Udy CIIm
8-4-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**